*This Question Paper contains 7 printed pages.*
***(Sections - A, B, C & D)***

Sl.No. 6272

# 03 (M)

**(MARCH/APRIL, 2022)**

---

***Time : 3 Hours]*** ***[Maximum Marks : 80***

**सूचना :**

1) हस्ताक्षर स्पष्ट लिहा.
2) या प्रश्नपत्रिकेमध्ये चार विभाग करण्यात आलेले आहेत. A, B, C आणि D व एकूण 1 ते 52 पर्यंत प्रश्न क्रमांक आहेत.
3) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत. प्रश्नांचे विकल्प आंतरिक आहेत.
4) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.
5) आवश्यक तेथे स्वच्छ आकृत्या काढा.
6) नवीन पानावर नवीन विभाग लिहा. प्रश्नांची उत्तरे अनुक्रमे लिहा.

---

## विभाग – 'A' (गद्य)

■ योग्य जोड्या जुळवा : **[4]**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| 1) द्विजगोरक्षण | अ) निळू दामले |
| 2) बिनपैशांचे खेळ | ब) इरावती कर्वे |
| 3) गौराई | क) दिलीप वि. चित्रे |
| 4) गच्चीवरील बाग | ड) म्हाइंभट |

■ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : [2]

5) वानर गावात येऊन कोठे बसला होता?

6) बडोद्याचे राजकवी कोण होते?

■ खालील प्रश्नांची दोन/तीन वाक्यात उत्तरे लिहा : [6]

7) श्रीमंतांच्या पालखी सोबतच्या लवाजम्यात कोण कोण मंडळी होती?

8) सयाजीराव महाराजांनी कलांचे महत्त्व ओळखून ती कशी जोपासली?

9) सह्याद्रीच्या गौरायांचे वैशिष्ट कोणते?

अथवा

समर्थांनी संभाजीस राज्य कारभार कसा करावा म्हणून सांगितले आहे?

■ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : [8]

10) चक्रधर स्वामी गायींना घेऊन निघाले त्यावेळी ब्राम्हणाने काय काय सुचना दिल्या?

11) कपऱ्यांना असणारे महत्त्व आजोबांनी कसे समजावून दिले?

अथवा

भोवरा कसा बनवला जातो? भोवऱ्याचा खेळ कसा खेळला जात असे?

## विभाग - 'B' (पद्य)

■ खालील दिलेले विकल्प निवडुन रिकाम्या जागा भरा: [4]

12) ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे आधीचे नांव .................. होते.

अ) भावार्थ दिपीका ब) चांगदेव पासष्टी

क) अभंग ड) महाभारत

13) कवीच्या कवितेने काट्याकुट्यात ................ जतन करावी?

अ) चव ब) हिरवळ

क) गोडवा ड) भाषा

14) 'दुपार' या कवीतेतील वर्णन ............... वेळेचे आहे.

अ) सकाळ ब) संध्याकाळ

क) दुपार ड) रात्रीचे

15) 'श्रावणझड' या कवितेचे कवी कोण .............. आहेत.

अ) केशवसुत ब) बालकवी

क) पाडगांवकर ड) अनिल

■ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : [2]

16) जवानाच्या घरासमोर कशाचे झाड आहे?

17) मला काय बोचते आहे, असे कवी म्हणतो?

■ खालील प्रश्नांची दोन/तीन वाक्यात उत्तरे लिहा : [6]

18) कवीने दुपारचे केलेले वर्णन तुमच्या शब्दात लिहा.

19) काट्याकुट्यात हिरवळ जतन करावी यातील भावार्थ समजवा.

20) घराचे वर्णन कवीने कवितेत कसे केले आहे.

अथवा

नेत्यांच्या उंच प्रसादाचा जाब का मागितला पाहिजे.

■ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : [8]

21) संत ज्ञानेश्वरांच्या विराणीमधुन भक्ताची मन:स्थिती कशी व्यक्त झाली आहे ते लिहा.

22) स्वातंत्र्याचा जमाखर्च मांडण्याची वेळ आली आहे असे कवीला का वाटते.

अथवा

श्रावणझड या कवितेच्या आधारे 'श्रावणातल्या' पावसाचे वर्णन करा.

## विभाग – 'C' (व्याकरण)

■ सूचने प्रमाणे उत्तरे लिहा :

■ वाक्य रुपांतर करा : [2]

23) जगी सर्वसुखी असा कोण आहे (हे वाक्य प्रश्नार्थी करा)

24) मी नेहमी लवकरच उठतो (हे वाक्य नकारार्थी करा)

■ वाक्य संश्लेषण करा : [2]

25) तुम्ही चहा घ्या किंवा कॉफी घ्या. (केवल वाक्य करा)

26) आळशी माणसे आयुष्यात काहीही चांगले काम करु शकत नाहीत (मिश्र वाक्य करा)

■ समास ओळखा : [2]

27) यथाशक्ती

28) पंचवटी

■ अलंकार ओळखा : [2]

29) सीतेचे मुख चंद्रासारखे आहे.

30) गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले.

■ वृत्त ओळखा : [2]

31) प्रभाते मनी राम चिंतीत जावा

32) अनुदिनी अनुतापे तापलो रामराया

■ समानार्थी शब्द लिहा : [2]

33) अश्व

34) आई

■ विरुध्दार्थी शब्द लिहा : [2]

35) दयाळू

36) स्वातंत्र्य

■ पुढील शब्दसमुहासाठी एक शब्द लिहा : [2]

37) स्वच्छतेसाठी केलेले सतत काम

38) क्रांती करणारे

■ खालील वाक्प्रचाराचा अर्थ लिहा : [2]

39) जतन करणे

40) कष्ट उपसणे

■ ग्रामीण शब्दांसाठी मराठीतील रुढ शब्द लिहा : [2]

41) शनवार

42) ईचार

## विभाग – 'D' (अर्थग्रहण / लेखन विभाग)

■ खालील पैकी कोणत्याही एका विषयावर कल्पनाविस्तार करा : [4]

43) प्रयत्नातील परमेश्वर

44) देव भावाचा भुकेला

45) पत्र लेखनः तुम्ही – तुमच्या मित्रांसोबत सहलीला जाणार आहात असे तुमच्या वडिलांना पत्राने कळवा. [4]

पत्ताः 44 सद्गुरु सदन

बापट मार्ग कोथरुड पुणे.

(सुचना : पत्रात तुमचे नांव पत्ता किंवा सहीचा उल्लेख करु नये.)

■ खालील अपठित गद्य उतारावाचुन त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. [4]

कशासाठी काय सोडायचे हे ज्याला बरोबर कळते तोच खरा ध्येयवादी तिथेच त्याचा खरा कस लागत असतो. मी आफ्रिकेत धर्मोपदेश करणार नाही. फक्त वैद्यकीय मदतीचे काम करीन असे वचन डॉ. खाइत्झर यांनी दिले होते. आणि पियानोची पेटी उघडून पाहायलाही त्यांना कित्येक दिवस सवड मिळाली नाही. लोकमान्य टिळक नेहमी म्हणत असत, देशाच्या स्वातंत्र्याचा लढा मला लढायचा नसता तर मी गणिताचा प्राध्यापक – होऊन राहिलो असतो. गणित हा लोकमान्यांचा आवडता विषय पण देशाच्या सेवेसाठी त्यांनी तो सोडुन दिला. ध्येयापुढे आवड बाजूला सारावी लागते. आवड म्हणजे तरी सुखच. ध्येयाशी मैत्री करावयाची तर सुखाची संगत सोडावीच लागणार. संत तुलशीदासांनी प्राणापलीकडे प्रेम असलेली पत्नी देवासाठी सोडली. देवाच्या सेवेसाठी पत्नीचा त्याग केला आणि धर्माच्या सेवेसाठी संभाजी महाराजांनी तर देहत्याग केला.

46) खरा ध्येयवादी कोण?

47) डॉ. खाइत्झर त्यांनी कोणते वचन दिले होते?

48) लोकमान्य टिळकांनी कोणत्या विषयाचा त्याग केला?

49) देशाच्या सेवेसाठी त्याग करणाऱ्यांची नावे लिहा?

■ खालील दिलेल्या मुद्यावरुन कोणत्याही एका विषयावर सुमारे 200 शब्दात निबंध लिहा : **[8]**

50) माझे बालपण.

मुद्दे : मी बालक होतो आईने मला सुनावले ............ आता तुमच .......... बालपण सरल बरं का? ......... आपण मोठे झालो ही .......... जाणीव ......... नाना बंधने आलीत ........... हट्ट नाही, ......... लाड नाहीत बालपणातील भावडेपणा, निरागसपणा आता संपला ............ खरोखरच हे बालपण .............. सगळीकडे स्वच्छदंता असते. माझे बालपण असेच ......... सुंदर होते ........... मी ज्ञान, धन, किर्ती मिळवु शकेल .......... पण हवे असलेले बालपण.

51) मोबाईल शाप की वरदान.

मुद्दे : आजचे युग ........... ज्ञानविज्ञान ......... तंत्रज्ञानाचेयुग ........... आज मोबाईल Online .......... शिक्षण ............. काळजी घ्यावी ............. पण अभ्यास शाळा बंद .......... लहानांपासुन .......... तर मोठ्यांपर्यंत ............ हातात ................ पहावयास ......... आज 21 वे ........... शतक ......... नफा नुकसान ...........

52) मी पंतप्रधान झालो तर ..........!

जर मी भारत देश पंतप्रधान ............ एक बळकट देश ............ प्रयत्न .......... मी भारतीय सैन्यांना जगातील सर्वात ........... शक्तीशाली सैन्य ................. बनविण्याचा प्रयत्न ............ मला भारतातून .............. दारिद्र्य गरिबी आणि बेरोजगारी दुर .............. भारत हा कृषी प्रधान देश ............ शेती क्षेत्रात सुधारणार ............. शिक्षण क्षेत्र ............ आरोग्यची निगा ............. प्रगती पथावर वाटचाल ............. शांतता प्रस्थापीत.

⌘⌘⌘